२८९६९

जा.क्र. आस्थ-ड-मा-/पुवि/७३
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक:- 19 NOV 1993

प्रति,
शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद ----पुणे----------------

विषय:- इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळेत सुरु करणे बाबत..
येडेश्वर विद्या मंदिर, येडगांव, ता. जुन्नर

संदर्भ :- आपले पत्र क्रमांक-शिक्षण/माध्य/ह-४/५वी/परवानगी ९३-९४ दि. १४/९/९३.

उपरोक्त विषयाधिन संदर्भाच्या पत्रान्वये कळविण्यात येते की, १९८३-८४ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी दिलेल्या नवीन माध्यमिक शाळांना इ. ५वी ते ७वीचे वर्ग नव्याने सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत शासन पत्र क्र. एसएसएन-१०८५/२३४८५ [२४४-एन] मा.शि-१, दि. २९/१/८६ व दि. २०/१२/८८ च्या शासन आदेशानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांना प्रदान केलेल्या अधिकाऱ्याच्या अधिन राहून खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर इ. ५वी ~~ते ७वी~~च्या वर्गांना जून १९९३ या शैक्षणिक वर्षापासून विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

अटी:- १] इ. ५वी ~~ते ७वी~~ च्या वर्गाची परवानगी ही विना अनुदान तत्वावर राहील.

२] मा. शा. संहिता नियम ३, २, नुसार सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

३] तसेच वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश/नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.

वरील प्रमाणे संबंधितांस कळवावे तसेच आपण सदर शाळेस १५ दिवसाचे आत भेट देऊन इ. ५वी ते ७वीच्या सध्या सुरु असलेल्या वर्गाची तपासणी करावी व तपासणी अहवाल व आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास कळवावा.

मा. शि. उ. सं. यांच्या मान्य टिपणीनुसार

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत:- १] मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन मुंबई -३२. यांना सविनय सादर.
२] मुख्याध्यापक येडेश्वर विद्या मंदिर, येडगांव ता. जुन्नर जि. पुणे.